# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक सुनिल बळीराम महाजन, वय ५५ वर्ष, पद वरिष्ठ लीपीक, वर्ग–३,प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट १ ले, चिखली जि.बुलडाणा रा.एकता नगर, बुलडाणा ता.जि.बुलडाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५००/– |
| स्विकारेली लाचेची रक्कम | २००/– |
| घटना स्थळ | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट १ ले, चिखली,फौजदारी विभाग |
| घटना तारीख | २५.०२.२०२२ |

सदर गुन्हयाची हकीकत अश्या प्रकारे आहे की, तक्रारदार अब्दुल आरिफ अब्दुल सत्तार, वय ३२ वर्ष, व्यवसाय मजुरी, रा.नगरपरिषद जवळ चिखली, जि. बुलडाणा यांचे विरुध्द प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट १ ले, चिखली येथे केस क्रमांक २०२/२०११ कलम ४९८ (अ) भांदवि. नुसार केस चालु असून लोकसेवक सुनिल बळीराम महाजन, वय ५५ वर्ष, पद वरीष्ठ लिपीक, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट १ ले, चिखली,यांनी सदर केसच्या नकला देण्याकरिता ५००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक २५.०२.२०२२ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा घटकाकडे तक्रार नोंद केली होती सदर तक्रारीवरुन लोकसेवक महाजन यांची लाचमागणी पडताळणी कार्यवाही केली असता लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक महाजन, वरीष्ठ लिपीक यांनी तक्रारदार यांना त्यांचेविरुध्द सुरु असलेल्या केसच्या नकला देण्याकरिता २००/– रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्यास समती दर्शविल्याने सदर प्रकरणात दिनांक २५.०२.२०२२ रोजी सापळा कार्यवाही आयोजीत केली असता सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक महाजन, वरीष्ठ लिपीक यांनी तक्रारदार अब्दुल आरिफ अब्दुल सत्तार यांचेकडुन प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट १ ले, चिखली येथिल फौजदारी विभागामध्ये २००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारून लोकसेवक महाजन यांनी स्वत:चा अर्थिक फायदा करून घेवून लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन करून कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ नुसार गुन्हा केला असून त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन चिखली येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदर कार्यवाही :– १. मा.श्री. विशाल गायकवाड,पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती परिक्षेत्र अमरावती
२. मा.श्री.अरुण सावंत,अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावती
३.मा.श्री.संजय चौधरी,पोलीस उपअधिक्षक,ला.प्र.वि.बुलडाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री.सचिन इंगळे,पोलीस निरीक्षक, सफौ.शाम भांगे, पोकॉ अझरूदीन काझी यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा. कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

(सचिन इंगळे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा

Scanned with CamScanner